Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# MAHATMA JYOTIBA PHULE VA SAVITRIBAI PHULE YANCHE PRERANASTHAN VA ADHARSTHAMBH SAGUNABAI KSHIRSAGAR URF AAU



**Dr. G. N. DHALE**
Assistant Professor of History
Smt. G. K. G. Kanya Mahavidyalaya, Jaysingpur
Mob. 9881849320

©EIJMR All rights reserved.

http://www.epitomejournals.com Vol. 7, Issue 1, Jan 2021, ISSN: 2395-6968

# संशोधन पेपर

जानेवारी २०२१

## विषय :— म. जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे प्रेरणास्थान व आधारस्तंभ

## सगुणाबाई क्षीरसागर उर्फ आऊ

डॉ जी. एन. ढाले
अस्सिटंट प्रोफेसर

श्रीमती जी. के. जी. कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर
मो. नं. ९८८१८४९३२०

©EIJMR All rights reserved.

# म. जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे प्रेरणास्थान व आधारस्तंभ सगुणाबाई क्षीरसागर उर्फ आऊ

## प्रस्तावना

१८ व्या १९ व्या शतकातील महाराष्टातील प्रबोधनात अनेक समाज सुधारकांनी आपल्या सामाजिक शैक्षणि सांस्कृतिक व राजकीय कार्यानो महाराष्टाचे आधुनिकीकरण केले. त्यामध्ये अनेक पुरूष समाज सुधारक होते. पण त्या सुधारकोना काही स्त्रियांनी सर्व प्रकारची मदत केली. त्या स्त्रीयांची मात्र इतिहास अभ्यासक व संशोधकांनी म्हणवी तितकी दखल घेतली नाही त्यामुळे अशा अनेक कतृत्वान स्त्रियांना इतिहास व त्यांचे कार्य उजेडात आणणे महत्वाचे असून हा शोध निबंधाचा उद्देश आहे. म्हणून सगुणाबाई क्षीरसागर उर्फ आऊ यांच्या कार्याची दखल घेणे महत्वाचे आहे.

सगुणाबाई हया फुले कुटुंबातील स्त्रीची अनेक इतिहासाचे वाचक, अभ्यासक व लेखकांनी एवढेच नव्हे तर पुरोगामी चळवळीतील लेखकांनी तसेच इतर साहित्यिकानी म्हणावी तितकी दखल घेतली नाही. म्हणून त्यांच्या दुर्लक्षित कार्याचा आढावा घेणे महत्वाचे आहे. सगुणाबाई मुळे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुलेच नव्हे तर युगप्रवर्तक जोतिरावांच्याही प्रेरणास्थान व आधारस्तंभ होत्या त्याचबरोबर जोतिबा सावित्रीचा विवाह घडवून आणण्यात त्यांचा पुढाकार होता. म्हणून त्यांच्या कार्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

सगुणाबाई क्षीरसागर उर्फ आऊ या फुले दांपत्याची प्रभावी प्रेरणा होती. म. जोतिराव फुले व सावित्रीबाई हयांच्या हातून शैक्षणिक सामाजिक असे क्रांतीकार्य घडले त्यामध्ये सगुणाबाईंचे स्थान अनन्य साधारण आहे. त्या गुणी मायाळु परोपकारी दूरदृष्टीच्या होत्या. जोतिबा व सावित्रीला घडविण्यासाठी सगुणाबाईंनी जे श्रम घेतले ते पाहिल्यास एक सामान्य स्त्री एवढया दूरदृष्टीची होती याचे आश्चर्य वाढते. सगुणाबाई क्षीरसागर सारख्या स्त्रीरत्नाचा काळाच्या ओघात गडप झालेल्या कार्याला पुन्हा एकदा नव्याने इतिहास शोधून काढून उजाळा देऊन त्याचा आढावा घेणे महत्वाचे आहे.

©EIJMR All rights reserved.

http://www.epitomejournals.com Vol. 7, Issue 1, Jan 2021, ISSN: 2395-6968

## जीवनचरित्र व कार्य

सगुणाबाईंची जन्म नोंद कोणत्याच समकालीन कागदपत्रात व साहित्यात सापडत नाही. पण त्या जोतीरावांच्या जवळच्या नात्यातील होत्या. गोविंदराव फुलेंची पत्नी चिमणाबाई (जोतिरावांची आई) हिला धोंडाबाई ही बहिण होती त्या दोघी धनकवडीच्या पाटलांच्या मुली, धोंडाबाईस हडपसर येथील क्षीरसागरांच्या घरी दिले होते याच धोंडाबाईची मुलगी सगुणाबाई दुर्दैवाने सगुणाबाईच्या माहेरी कुणीच उरले नाही व नवऱ्याच्या मृत्युनंर एकाकी सगुणाबाईंनी पुण्यातील जॉन या गोऱ्या मिशनऱ्याकडे त्याची मुले सांभाळण्याची नोकरी पत्करली. त्यांना लिहिता वाचता येत नसे पण मिशनऱ्यांच्या संपर्कामुळे थोडेफार इंग्रजी बोलता येत असे. ११/०४/१८२७ रोजी जोतिराव फुले यांचा जन्म झाला. जोतिराव ९ महिन्याचे असतांना त्यांच्या मातोश्री चिमणाबाईचे निधन झाले. त्यामुळे मातृछत्र हरविलेल्या बाल जोतिबांना सांभाळण्याची इच्छा स्वत: सगुणाबाईंनी व्यक्त केल्यावर गोविंदरावांनी सगुणाबाईवर जबाबदारी सोपविली. जोतिबांचे लेखन वाचन इ. शिक्षण पुर्ण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी १८३२ मध्ये चर्च ऑफ स्कॉटलॅंड मिशन मध्ये गोविंदरावांनी जोतिबांना घातले. पण सनातन्यांनी यावर पुण्यात गोंधळ माजवला. कृष्णाजी देव या गोविंदरावांच्या कारकुनाने धर्माची व देवाची भीती दाखविल्याने आपणास वाळीत टाकतील या भीतीपोटी गोविंदरावांनी १८३६ – जोतिबांचे शिक्षण बंद केले.

जोतिबांची हुशारी जाणून असलेल्या सगुणाबाई यामुळे अस्वस्थ झाल्या. त्यांनी आपल्या परिचयाचे लिजिटसाहेब व गफार बेग मुनशी यांच्यामार्फत गोविंदरावांचे मन वळवण्यात यशस्वी ठरल्याने दि. ०१ जानेवारी १८४३ पासून बुधवार पेठ वाडयात जोतिबा शाळेत जाऊ लागले. जोतिरावांच्या पुन्हा सुरू झालेल्या या ऐतिहासिक शैक्षणिक पर्वाचे श्रेय सगुणाबाईंकडे[२] जाते नंतर जरी जोतिरावांनी सगुणाबाईंना मराठीचे शिक्षण दिले तरी त्यांनीच जोतिबांना इंग्रजीची तोंडओळख करून दिली. सगुणाबाई हुशार, चाणाक्ष व कल्पक वृत्तीच्या होत्या त्यांनी जोतिबांना सतत शिकुन मोठा होण्याचा उपदेश केला. तसेच जोतिबांच्या ठिकाणी असलेल्या सुप्त गुणांच्या कल्पकतेने विकास घडवून आणला.

सावित्री व जोतिबांचे लग्न जुळवून आणण्यात पुढाकार त्यांनीच घेतला[३], एवढेच नव्हे तर विवाहानंतर सावित्रीलाही आपणाबरोबरच शिक्षण दयावे, यासाठी सगुणाबाईंनी दोघींना जोतिरावांनी शिकवावे असा आग्रह धरला. जोतिरावांनाही आपल्या शिक्षण कार्यात शिक्षिका हवीच होती म्हणून त्यांनी सावित्रींनां व सगुणाबाई (आऊ) यांना शिकविण्याचे क्रांतीकारी कार्य हाती घेतले. पण यावेळीही सनातनी जातीयवादी रूढी प्रिय समाजाने धर्म बुडाला कलीयुग आले, म्हणून विरोध केला यावेळीही सगुणाबाईचा सल्ला जोतिरावांना उपयुक्त ठरला. त्यामुळे सावित्रीबाई व सगुणाबाईचे शिक्षण सुरू राहिले. विशेषत: सावित्रीबाई शिकू लागल्या हा शिक्षणाचा म. फुलेंनी आरंभ म्हणजे भारतात भारतीयाने केलेला स्त्री शिक्षणातला पहिला प्रयोग ठरला. येथूनच स्त्री शिक्षणाच्या नव्या पर्वाला आरंभ होतो. या मागील प्रेरणा सगुणाबाई (आऊ) हयाच होत. १८४६ मध्ये सावत्रीबाई व सगुणाबाई ४ थी पास झाल्या. त्यावेळीही त्यांनी वडीलधाऱ्यांच्या नात्याने वयाने त्या मोठया असल्याने सावित्रीस आधार दिला.

पुण्यामध्ये मिचेल मॅडमनी त्यांच्या नॉर्मल स्कूलमध्ये दोघींचीही परीक्षा घेतली त्यामध्ये दोघीही पास झाल्या व शिक्षिका बनल्या. पुढे जुन १८४७ मध्ये पुण्यातील वानवडी येथील महारवाडसात जोतीरावंनी शाळा सुरू केली. तेथे सगुणाबाई शिक्षिका होत्या, पण नंतर सनातनी व कर्मठ लोकांनी ती शाळा बंद पाडली.

सगुणागाई गोऱ्या अधिकाऱ्यांच्या घरचीही कामे करत असल्याने त्यांनी अनेक तात्वीक सामाजिक इंग्रजी पुस्तके व ग्रंथ जोतिबा व सावित्रींना वाचण्यास मिळवून दिले तर कामातून मिळालेला पैसा जोतिरावांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी निस्वार्थी पणे दिला. फुले दांपत्तीच्या अलौकीक कार्यात सगुणाबाईंचे स्थान अनन्य साधारण होते. याबद्दल स्वत: म. फुले म्हणतात, 'आईसारखे दैवत नाही पण जिने मला जन्म दिला ती आई आठवत नाही. ही उणिव माझ्या आऊने सगुणाबाईने भरून काढली तिला वाटे मी मोठा फादर व्हावे. ती मला सतत ज्ञानबोध करी तीने माझी लहानपणी काळजी घेतली व मला कधीही कमी नं पडणारी ज्ञान संपत्ती दिली, धन्य माझी आऊ.[५]'

म्हणजेच सगुणाबाई उर्फ आऊ यांची मदत सुरूवातीच्या काळात फुले दांपत्याला किती झाली हे दिसून येते म्हणून नंतर १८५३ मध्ये भायखळ मुंबई येथे प्रकाशित झालेल्या 'निर्मिकाचा शोध' हे आपले लहानसे पुस्तक म. जोतिरव फुलेंनी सगुणाबाईस अपर्ण केले.

म्हणजेच यावरून स्पष्ट होते की जोतिराव व सावित्रीबाईच्या जडणघडणीत व सामाजिक कार्यात सगुणाबाईंचे स्थान किती महत्वाचे होते व त्यामुळेच सुरवातीच्या काळात जोतिराव फुले व त्यांच्यामुळेच सुरवातीच्या काळात जोतिराव फुले व सावित्रीबाईंना सामाजिक शैक्षणिक कार्याला प्रेरणा व पाठिंबा मिळाला.

'सत्यस्वरूप सगुणाबाई भ्रतार खंडू क्षीरसागर ईस तुम्ही मला नुसते जाणविलेच नसून माणेस बनविले. दुसऱ्याच्या मुलावर प्रेम करावे. हे मी तुमच्याकडून शिकलो. याबद्दल कृतज्ञतापूर्वक हे पुस्तक तुम्हास ग्रंथकर्त्याने नजर केले असे.[६]' ६ जुलै १८५४ मध्ये पुण्याजवळ फुरसुंगी येथे कॉलऱ्याने सगुणाबाईंचे शोचनीय निधन झाले त्यामुळे फुले दांपत्यास जबर धक्का बसला यावेळी कृतज्ञता व्यक्त करताना सावित्रीबाईंनी अतीव दु:खातून उत्सफुर्तपणे काव्य पुढीलप्रमाणे रचले.

आपली आऊ फार कष्टाळू
प्रेम तैशी होती दयाळू
सागर वाटे उथळ क्षणी
आभाळ ठेंगणे तिच्याहूनी
आऊ आमच्या घरी आली.
टाक घेऊनी पहा बसली
मुर्तीमंत जणू विद्यादेवी
हृदयी आम्ही तिला साठवी[७]

 ©EIJMR All rights reserved.

सारांश

अशाप्रकारे या थोर स्त्रीची योग्यता, कतृत्व, सामाजिक शैक्षणिक अडचणीवेळी केलेली मदत यावरून स्पष्ट होते. म्हणून जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांची सगुणाबाई क्षीरसागर उर्फ आऊ ही प्रभावी प्रेरणा होती असे म्हणावे लागेल.

संदर्भ ग्रंथ सुची

१. डॉ. माळी मा. गो. 'क्रांती जोति सावित्रीबाई जोतिराव फुले' आशा प्रकाशन, गारगोटी, कोल्हापूर तृ. आ. नोव्हे. १९८१ पान –३४.

२. कित्ता पान –३६

३. उगले जी. ए. 'सावित्रीबाई फुले', साकेत प्रकाशन औरंगाबाद प्र. आ. २००७ पान नं. १०

४. डॉ. माळी मा. गो., उपाध्ये निला संपादक– 'सावीबाई फुले' काल अणि कतृत्व', महाराष्ट राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई – व्दि. आ. जुलै २००६ पान ५३.

५. झोगडे द. स. संपादक 'गाववाडा' क्रांती विशेषांक जुलै १९७२ पुणे पान नं. १७.

६. फुले जोति गोविंद, 'निर्मिकाचा शोध', भायखळा मुंबई १८५३ प्रस्तावना पान नं.२

७. पवार ना. ग. 'सावित्रीबाई फुले' : अष्टपलू व्यक्तीमत्व, पछमगंधा प्रकाशन जाने. २०१२ व्दि. आ. पान.८६.